एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत पर्यवेक्षिकांची पदे भरण्याबाबत परिक्षापध्दती.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक एबावि-२००५/ प्र.क्र.४६/ का-७
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ८ मार्च, २००५.

**वाचा** - १. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि-२००१/ प्र.क्र.१४६/ का ६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००१.
२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि-२००१/ प्र.क्र.१४६/ का ६, दिनांक ७ डिसेंबर, २००१.
३. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि-२००१/ प्र.क्र.१४६/ का ६, दिनांक २ जानेवारी, २००२.
४. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि-२००२/ प्र.क्र.२७५/ का ६, दिनांक १६ जुलै, २००३.

**निर्णय** - एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत मंजूर करण्यात आलेल्या पर्यवेक्षिकांच्या (मुख्य सेविका) एकूण पदापैकी ५०% पदे अर्हता प्राप्त (मॅट्रीक्यूलेट) व १० वर्षे मानधनी सेवा झालेल्या अंगणवाडी सेविकांमधून भरण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित परिक्षा व गुणांकन पध्दती विहित करण्यात येत आहे.

१. वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परिक्षा ७५ गुणांची घेण्यात यावी.

२. तोंडी परिक्षा २५ गुणांची घेण्यात यावी. त्याची विभागार्णी पुढीलप्रमाणे राहील -

अ. किमान पदवीधर असल्यास -५ गुण

ब. अंगणवाडी कार्यकर्ती म्हणून सेवेसाठी १० गुण, पैकी किमान ११ ते १५ वर्षापर्यंत सेवा झाली असल्यास ५ गुण व १५ वर्षापेक्षा जास्त सेवा झाली असल्यास - १० गुण.

क. निवड समितीने दयावयाचे कमाल गुण - १० गुण.

३. उत्तर पत्रिकांची तपासणी झाल्यांनतर कमीत कमी ३५ गुण प्राप्त करणा-या उमेदवाराची गुणानुक्रमे यादी तयार करण्यात यावी. ३५ पेक्षा कमी गुण प्राप्त करणारे उमेदवार निवडीसाठी पात्र राहणार नाहीत.

४. तोंडी परिक्षा होताच शेवटच्या दिवशी लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या गुणांची यादी उतरत्या गुणानुसार सूचना फलकावर लावण्यात यावी.



March D-7

५.  लेखी परिक्षेतील गुणांच्या फेरतपासणीचा अर्ज सादर करण्याची मुदत १५ दिवसांची राहील. अर्ज सादर केल्यापासून १५ दिवसांच्या आत फेर तपासणीबाबतचा निर्णय संबंधितांना कळविण्यात यावा.

२.  संदर्भाधिन अनुक्रमांक १,२ व ३ येथील शासन निर्णयानुसार विहित केलेल्या उर्वरित अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही. या शासन निर्णयातील आदेश शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जी. एम. फोपळणकर )
शासनाचे उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.मंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय,मुंबई.
मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय,मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई / नागपूर
विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,कोकण भवन,नवी मुंबई.
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
सर्व जिल्हा धिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
सर्व कक्ष अधिकारी , महिला व बाल विकास विभाग
निवड नस्ती (कार्यासन- ७)

March D-3

Scanned with OKEN Scanner